महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
यांचे कार्यालय मित्तल टॉवर, सी-विंग, सी-२८, दुसरा मजला, नॉरमन पॉईंट, विधानभवनजवळ मुंबई-४०००२१
Email -:commfishmaha@gmail.com Website -: http://fisheries.maharashtra.gov.in


जा.क्र. मत्स्य/०५३१०१/७४७/२०२४-२५ (भाग-२) दिनांक- ०१/०७/२०२६

प्रति,

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,

पालघर/ठाणे/मुंबई-उपनगर/मुंबई-शहर/रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग

विषय- शासन आदेश दि.२९ जून २०२६ अन्वये पावसाळी मासेमारी बंदी कालावधीमध्ये सुधारणा करण्यात येत असल्याबाबत.

संदर्भ- १. शासन आदेश क्र. मत्स्यवि-१११५/प्र.क्र.१३७/पदुम-१४, दि.०१/०६/२०१५.
२. शासन आदेश क्र. मत्स्यवि-११२६/प्र.क्र.१९९/पदुम-१४, दि.२९/०६/२०२६.
३. या कार्यालयाचे समक्रमांकाचा पावसाळी मासेमारी बंदी आदेश दि.११/०५/२०२६

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन आदेश दि. ०१ जून २०१५ अन्वये मासळीच्या साठयाचे जतन तसेच मच्छीमारांचे जिवीत व वित्त यांचे रक्षण या हेतुने दि. १ जुन ते ३१ जुलै या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पावसाळी मासेमारी बंदी लागु करण्यात आल्यामुळे दरवर्षी प्रमाणे या वर्षी दि. १ जुन २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी लागु करण्यात आल्याबाबत या कार्यालयाच्या दि. ११/०५/२०२६ रोजीच्या आदेशान्वये सर्व जिल्हा कार्यालयास कळविण्यात आलेले आहे व त्यानुसार पावसाळी मासेमारी बंदी कालावधीची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

तदनंतर शासनाने शासन आदेश दि. ०१ जून २०१५ चे अधिक्रमण करुन शासन आदेश दि.२९ जून २०२६ अन्वये पावसाळी मासेमारी बंदी कालावधीमध्ये सुधारणा करुन राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांस दि.१ जुन ते १५ ऑगस्ट (दोन्ही दिवस धरून ७६ दिवस) पावसाळी मासेमारी बंदी कालावधी लागु करण्यात आलेली आहे. सबब, या कार्यालयामार्फत या पुर्वी पावसाळी मासेमारी बंदी कालावधीच्या अनुषंगाने निर्गमित समक्रमांकाचे आदेश दि.११/०५/२०२६ मध्ये नमुद असलेला दि. १ जुन २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधी ऐवजी दि.१ जुन २०२६ ते १५ ऑगस्ट २०२६ (दोन्ही दिवस धरून) हा वाचण्यात यावा.

सुधारीत पावसाळी मासेमारी बंदी कालावधीबाबत प्रत्येक मासळी उतरविणा-या बंदरावर व मच्छिमार सहकारी संस्थेमध्ये पोस्टरद्वारे, भितीपत्रकाद्वारे, बॅनरद्वारे तसेच जनजागृती कार्यशाळा आयोजित करुन पावसाळी मासेमारी बंदी कालावधीबाबत विस्तृत प्रसिध्दी करण्यात यावी. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीच्या आदेशाची कठोरपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पावसाळी मासेमारी बंदी आदेशाचा भंग करुन मासेमारी करणाऱ्या नौका आढळल्यास अश्या नौकावर सागरी कायद्याअंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात यावी.

मासेमारी व्यवसायातील विविध गटांचे विशेषत: पारंपारिक मच्छीमारांचे हितसंबंध जपण्यासाठी व शाश्वत मासेमारी व्यवस्थापनाव्दारे भविष्यकालीन मत्स्यसाठयाच्या जतनासाठी पावसाळी मासेमारी बंदी कालावधीचा भंग करुन अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांस आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता पावसाळी बंदी कालावधीत आपल्या कार्यक्षेत्रातील मासळी उतरविणारी बंदरे, जेट्टी, गावे किंवा अन्य संशयीत ठिकाणे ज्या ठिकाणाहून चोरी छुपे अश्या अनधिकृत नौका समुद्रात मासेमारीस जातील वा मासेमारी करुन या

ठिकाणी मासळी उतरवतील अश्या सर्व संशयित ठिकाणावर गोपनीय पध्दतीने धाड टाकुन अश्या अनधिकृत नौकांवर सागरी कायद्यांतर्गत कठोर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेले सर्व मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, परवाना अधिकारी, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, वसुली अधिकारी, अधिक्षक, मत्स्यक्षेत्र प्रगणक, वरीष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व इतर कर्मचारी, सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक याचे पथक तयार करुन पोलीस व सागरी पोलीस यांचे समवेत सयुक्तिक अभियान राबवुन राबविण्यात यावे. सदर अभियानामध्ये महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ च्या कायदयामधील तरतुदी अन्वये निर्गमित केलेले आदेश, अधिसुचना यांचे उल्लघन करणा-या ज्या काही अनधिकृत नौका आढळतील अशा नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ कायद्याच्या तरतुदी अन्वये कठोर कारवाई करुन असे गलबत व त्यावरील साहित्य-उपसाधने जप्त करण्यात यावे तसेच अश्या नौकांचा मासेमारी परवाना रद्द करुन डिझेल कोटा स्थगित करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.

सदर कार्यवाही दरम्यान जे मच्छिमार तथा मच्छिमार संस्था याबाबत सहकार्य न करता अनधिकृत मासेमारीस प्रोत्साहन देत असल्याचे निदर्शनास येईल अशा मच्छिमार सहकारी संस्थेची नोंदणी रद्द करण्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव उपनिबंधक (मत्स्य), यांचे कडे सादर करण्यात यावा. तसेच सदरच्या अभियांनावेळी अनधिकृत तथा बेकायदेशिर मासेमारी तपासणी करिता जाण्यापुर्वी आपल्या कार्यक्षेत्रातील संबधित सागरी पोलिस यांच्याशी संपर्क साधुन शस्त्रधारी पोलिस बंदोबंस्त उपलब्ध करुन घेण्याबाबत उचित कार्यवाही करावी, जेणे करुन बंदरावर मच्छिमारांमार्फत घेराव घातल्यास अशा मच्छिमारांन विरुध्द शासकीय कामात अडथळा करीत असल्याबाबत फौजदारी कारवाई करण्याबाबत पोलिस विभागास प्रस्ताव सादर करणे सोईचे होईल. तरी, उक्त नमुद केल्यान्वये सुधारीत पावसाळी मासेमारी बंदी कालावधीबाबत कार्यक्षेत्रातील सर्व मच्छिमार सहकारी संस्था व संबधित विभाग यांना अवगत करावे तसेच बंदी कालावधीच्या प्रभावी अंमलबजावणीस्तव सयुक्तिक अभियान राबवुन आपल्या कार्यालयामार्फत सदर विषयी केलेला कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

(महेश देवरे)
सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (सागरी),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-

१.मा. जिल्हाधिकारी, पालघर/ठाणे/मुंबई-उपनगर/मुंबई-शहर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

२.मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, सागरी सुरक्षा व सुरक्षा, राज्य गुप्तचर विभाग, दादर, मुंबई-२८

३.मा. उपसचिव (मत्स्य), पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

४.मा. पोलिस आयुक्त, नवी मुंबई

५.मा. पोलीस उपायुक्त (सागरी पोलीस), पोर्ट झोन, मुंबई-०३८

६.मा. पोलीस अधिक्षक, पालघर/ठाणे/मुंबई-उपनगर/मुंबई-शहर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव-

प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई

यांना सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व सागरी जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याशी समन्वय साधुन उक्त विषयी योग्य ती उचित कार्यवाही करण्यात यावी.